**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७८ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. इब्राहिम इस्माईल तडकल<br>६५२, साखरपेठ, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप संचालक (शिक्षण प्रशिक्षण ),<br>महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - ३० | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - ३० | हजर |

अपीलकर्ता श्री. ईब्राहिम इस्माईल तडकल यांनी अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रमात कार्यशिक्षण, चित्रकला, हस्तकला, संगीत या विषयाचा समावेश करण्याचा मुख्य उद्देश, डी.एड शिक्षक कला-कार्यानुभव विषय शिकवू शकतो, या मताशी अभ्यासक्रम कार्यगट अध्यक्ष / सदस्य श्री. मल्लिकार्जुन सिंदगी सर हे सहमत आहेत का, असल्यास त्यांचा सदस्य अभ्यासक्रम कार्यगट, शिक्षक प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण, पुणे यांचा अभिप्राय, सहमती पत्राची झेरॉक्स प्रत, अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रम, स्त्रोत पुस्तिका कोणी तयार केली, त्या सदस्यांची शैक्षणिक पात्रतेसह यादी, अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रम पुस्तिका ०५ (चाचणी प्रत) प्रथम वर्ष पाठ्यक्रम ८, ९, १०, ११ तयार करणाऱ्या सदस्यांची (प्राध्यापकांची ) शैक्षणिक पात्रतेसह व पत्यासह नावे इत्यादी मुद्दयांबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा उप संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडे मागितली होती.

अपीलकर्त्यास माहिती मिळाली असून त्या माहितीने समाधान झाल्याचे वरील तीनही घटकांमधील चर्चेअंती अपीलकर्त्याने लेखी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 .८.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २६.५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०३ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. राजेंद्र एकनाथ दणके, ३९५, दैनिक लोक टाईम्स, मंगळवार पेठ, पुणे-११ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. राजेंद्र एकनाथ दणके यांनी पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय खडीक्रशर, तसेच खदान यांची यादी, शासकीय भूखंडावर विविध स्टोनक्रशर, खदान परवानगी कोणत्या नावाने दिली, त्यांची यादी, खाजगी शेतकरी अथवा उद्योजक यांच्या मालकीचे खदान, स्टोनक्रशर यांची यादी, पत्ते, शासकीय प्रोजक्टसाठी (उदा. धरणे, कॅनॉल, रस्ते, महामार्गांचे) काम करणारे शासकीय ठेकेदार यांनी खनिकर्म विभागाकडे वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी मुरुम आणि दगडापोटी भरलेली रॉयल्टी या सर्वांची यादी, नावे व पत्ते, वाळू उपशासाठी कोणाला परवानगी दिली, अशा परवानाधारकांची यादी व त्यांच्याकडून मिळालेली रॉयल्टी यांचा नाव व पत्त्यासह तपशील आदि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकाऱ्याने दिलेली माहिती अर्धवट, चुकीची असून शिरूर, वडगाव मावळ व इंदापूर या तालुक्यातील माहिती न मिळाल्याने अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची होती. सर्व तालुका स्तरावरील माहिती त्या त्या सक्षम अधिकाऱ्यांकडून घेता आली असती. परंतु आपल्याकडे ती मागितल्याने सर्व तालुक्यांच्या तहसीलदारांकडून मागवून संकलीत करून द्यावी लागली, असे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, पुणे यांनी लेखी स्पष्ट केले.

सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी, गौण खनिज शाखा यांनी अपीलकर्त्यास दि. २०.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये ऊर्वरित १४३ प्रति करिता एकूण २८६/- रूपये शुल्क भरण्यास कळविले होते. परंतु अपीलकर्त्याने शुल्क भरले नसल्यामुळे माहिती दिलेली नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी लेखी नमूद केले आहे. माहिती मागून शुल्क न भरण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याने ऊर्वरित माहिती शुल्क भरून जन माहिती अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्याकडून प्राप्त करून घ्यावी.

**पुणे**
**दि. ३०.८.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

ॲड.दौलत वि.मोरे
मु.पिंपरे खुर्द, पो.निरा, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
फलटण, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०४ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२००८ |

३. **उपस्थित**
ॲड.दौलत वि.मोरे
मु.पिंपरे खुर्द, पो.निरा, ता.पुरंदर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्रीमती रेश्मा माळी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.९.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे राजाळे, ता.फलटण येथील जमिनीबाबतचे आरटीएस/अपील नं.१६३/२००१ निकाल तारीख ३०.८.२००२ मध्ये खालील कोर्टाचा म्हणजे तहसीलदार, फलटण यांचा आरटीएस/कावि/एसआर ११० मधील दि.१३.२.२००१ रोजीचा आदेश रद्द केला आहे काय.

## विवेचन

उपविभागीय अधिकारी, फलटण यांनी आरटीएस प्रकरणी दिलेल्या निर्णयाने तहसीलदार, फलटण यांचा आदेश रद्द केला आहे किंवा नाही, याबाबतची माहिती अपीलकर्ता ॲड.दौलत वि.मोरे यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण, जि.सातारा यांनी विहित मुदतीत माहिती दिली. परंतु ही माहिती असमर्थनीय असल्याच्या कारणावरुन ॲड.मोरे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे अपील केले. तहसीलदार, फलटण यांच्या आदेशावरील अपिलांवर उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण यांनी दि.३०.८.२००२ रोजी संबंधित प्रकरणात निर्णय दिला आहे. तो मान्य नसल्यास मर्जीतर त्यांनी सक्षम न्यायालयात दाद मागणे आवश्यक होते, असे उपविभागीय अधिकारी, फलटण यांनी दि.१२.१२.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. उपविभागीय अधिकारी यांनी तहसीलदारांच्या निर्णयाविरुध्दचे अपील अंशतः मान्य केले असलयाचे ॲड.मोरे यांना विहित मुदतीत कळविले आहे. हा निर्णय अयोग्य असल्याचे ॲड.मोरे यांनी दि.१०.१२.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात व अन्य कागदपत्रातही नमूद केले आहे. परंतु हा विषय 'माहिती' या सदरात येत नाही. आरटीएस अपील क्र.१६३/२००१ मधील दि.३०.८.२००२ रोजी झालेल्या निकालाची प्रत ॲड.मोरे यांना उपविभागीय अधिकाऱ्यांनी द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला होता. त्याची त्याच दिवशी पूर्तता केल्याचे उपविभागीय अधिकारी, फलटण श्रीमती रेश्मा माळी यांनी आयोगाला लेखी कळविले आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१८.८.२००८**

ऑगस्ट-०८-८६-८७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४११ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. महादेव शंकर पवार<br>मु.पो. शिवणे, ता. सांगोला, जि. सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | ग्रामसेवक, ग्रामपंचायत शिवणे,<br>ता. सांगोला, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती सांगोला<br>ता. सांगोला, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. महादेव शंकर पवार यांनी सन १९९४ ते २००६ पर्यंत शिवणे ग्रामपंचायतीस मिळालेल्या विविध विकास निधी करवसुली खर्चाचे मस्टर, देणगी, मासिग सभा इतिवृत्त, ग्रामसभा इतिवृत्त, रो.ह.यो. धान्य वाटप कुपन, किर्दीचा उतारा, बँक पासबुक, वार्षिक पत्रके, अनधिकृत बांधकामे, पाणीपुरवठा घरकुल योजना इत्यादी विकास कामासंबंधीची माहिती मागितली होती.

वरील माहिती अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे आदेश दि. ३०.३.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक शिवणे यांना दिले. त्यानंतर अपीलकर्त्यास दि. २८.४.२००७ रोजी जन माहिती अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध करून दिली.

अपीलकर्त्याचा दि. १४.१२.२००७ रोजीचा जबाब पाहता दि. २८.४.२००७ रोजी माहिती मिळाली असल्याने आपली कोणतीही तक्रार राहिली नाही, असे नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** ३० .८.२००८

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ — stamp)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १७.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. भागवत विष्णूदास पारीख<br>निवास स्पिनिंग मिल्स लि., बी.२/२,<br>एमआयडीसी अक्कलकोट रोड, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | चेअरमन/ मॅनेजर<br>विकास सहकारी बँक लि. बाली वेस, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | हजर |

विकास सहकारी बँक लेखा परीक्षण अहवाल दि. २००४-२००५ मध्ये रू.१४.१३ लाखांचा अपहार झाला तेव्हा कॅश किती होती, सदर कॅश विहित मर्यादेपर्यंत होती काय, अपहारात दोषी व्यक्तींविरूध्द बँकेने केलेली कार्यवाही व त्यास कोणते संचालक जबाबदार आहेत, अशी माहिती अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, विकास सहकारी बँक लि., बाली वेस, सोलापूर यांच्याकडे मागितली होती.

बँकेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नाही, म्हणून उत्तर दिले नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी लेखी नमूद केले आहे. नागरी सहकारी बँका व पतसंस्थांना सदर अधिनियम लागू नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केले. तशा आशयाचे परिपत्रक सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट राज्य यांनी दि. ८.२.२००६ रोजी निर्गमित केले असून मुख्य राज्य माहिती आयुक्ती यांनी ते मान्य केल्याचा निर्णय राजेंद्र म्हेत्रे विरूध्द अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या द्वितीय अपिलामध्ये दि. २.३.२००७ रोजी दिला आहे. त्यामुळे तूर्त तोच निर्णय कायम ठेवण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** ३० .८.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**


राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१


राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२८ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. रमेश बापूराव पाटील<br>मु.पो. श्रीपूर, ता. माळशिरस, जि.सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याध्यापक, श्री. चंद्रशेखर विद्यालय व नारायण काका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय, श्रीपूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अध्यक्ष, शालेय समिती, श्री. चंद्रशेखर विद्यालय व नारायण काका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय, श्रीपूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. रमेश बापूराव पाटील यांनी सन १९९९ ते २००० व २०००-०१ या कालावधीतील त्यांची मान्यता प्रत तसेच सन २००६-०७ मध्ये संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या नेमणूक आदेशाची व रोस्टरची प्रत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. चंद्रशेखर विद्यालय यांच्याकडे मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी दि. २३.१०.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली असून सदर माहितीने समाधान झाल्याचे अपीलकर्त्याने लेखी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३०.८.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १८.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५६ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. श्रीपाद सुरेश शृंगारपुरे<br>ब्लॉ.नं.सी.६, आसरा हौ. सोसायटी<br>होटगी रोड, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,<br>उपविभाग, अक्कलकोट, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | कार्यकारी अभियंता, महावितरण, ग्रामीण<br>विभाग, उजनीनगर, मुरारजी पेठ, सोलापूर | हजर |

श्री. श्रीपाद सुरेश शृंगारपुरे यांनी गौडगाव, अक्कलकोट येथील गावठाण जागेवर कोणाला, केव्हापासून वीजपुरवठा देण्यात आला, वीज पुरवठा देताना घेतलेला पुरावा, वीज पुरवठ्यासाठी आवश्यक कागदपत्रे व पुरवठादारांनी सादर केलेली कागदपत्रे, दिलेल्या वीज पुरवठ्यापैकी घरगुती व कमर्शिअल यादी, वीज पुरवठा देताना कोणाची हरकत असल्यास रद्द करण्यात येतो, यापूर्वी केलेल्या तक्रारींची दखल का घेण्यात आली नाही, भागातील वीज ग्राहक, त्यापैकी नियमित बिल भरणारे व थकीत बिलधारक ही व इतर माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्याकडे मागितली होती. अपीलकर्त्यास शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी कळविले. अपीलकर्त्यांने ती भरली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले.

अपीलकर्त्याने संबंधित नावांची यादी कळवावी व त्यानुसार माहिती द्यावी, असे वरील तीनही घटकांमधील चर्चेत ठरले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याकडून यादी प्राप्त होताच जन माहिती अधिकारी यांनी १० दिवसात त्यांना आवश्यक ती माहिती द्यावी व पूर्तता अहवाल राज्य माहिती आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि.३० .८.२००८**

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**